**उलटतपास वादीतर्फे विधीज्ञ श्री. ए. बी. काळे यांच्यामार्फत :-**

१९. सदर साक्षीदार यांना दाखवण्यात आलेल्या महावीर दुकानाचा फोटा हा त्यांचाच असल्याचे ते मान्य करतात, करिता सदर दस्तास **निशाणी क्र. १७२** देण्यात येते. हे म्हणणे खरे नाही की, महावीर दुकान पुर्वी वादी चालवत होता. हे म्हणणे खरे नाही की, वादीच्या पुर्वीच्या फर्निचर व सामानासह मी महावीर दुकान चालवले. पुर्वी वादीचा कापड विक्रीचा व्यवसाय होता. वादीला भांडवलाची कमतरता असल्यामुळे त्यांना तो व्यवसाय चालवता आला नाही त्याबद्दल मला सांगता येत नाही. वादीने त्याचा कापडाचा व्यवसाय बंद केला.

प्रश्न - वडील हयात असताना सि. स. नं. ३३० मध्ये तुमचा ताबा होता ?

उत्तर - वडील हयात असताना मी सि. स. नं. ३३० मध्ये राहत होतो.

२०. हे म्हणणे खरे नाही की, आमच्या शेतजमीनीमध्ये मी व भाऊ सुरेश याने वादीला कधीही येवू दिले नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादीला सदर शेतजमिनीतुन कुठलेही उत्पन्न दिले नाही. हे म्हणणे खरे नाही की, एकत्रित कुटुंबाच्या उत्पन्नातुन मी व प्रतिवादी क्र. २ याने आमच्या नावे स्थावर व जंगम मालमत्ता खरेदी केल्या.

२१. गट क्र. १५४० स्थित वांबोरी हिच्या विक्रीसंदर्भात मी, भाऊ, बहिण, माझी आई व भाचा यांनी वादी याच्या नावे मुखत्यारपत्र करून दिले होते. सदर मुखत्यारपत्राआधारे वादीने सदर जमिनीचे खरेदीखत करून दिले. सदर नि.क्र. ९६ वरील खरेदीखत हे आमच्या गट क्र. १५४० या एकत्रित जमिनीचे होते. हे म्हणणे खरे नाही की, वादी व आमच्यात वादग्रस्त मिळकतीचे कधीही वाटप झाले नाही. सि.स.नं. ३३३ ही बहिणीच्या ताब्यात आहे यासंदर्भात मी माझ्या बहिणींना साक्षीदार म्हणून तपासणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी व अथवा प्रतिवादी क्र. २ याने वादग्रस्त मिळकतीत वडिलांच्या निधनानंतर कुठलेही बांधकाम केले नाही. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र. १७० निंभेरे येथील जमीन ही वडिलांनीच खरेदी केली व त्यांनीच विकली.

साक्षीदार स्वत: सांगतो की, सदर जमीन वादींनी विकली. हे म्हणणे खरे नाही की, माझे चुलत भाऊ ॲड.मुथ्था यांनी वाटपचा दस्त करून आम्ही त्यावर आम्ही तिघा भावांनी सह्या केल्या असल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर वाटपावरून आम्हा तिघा भावांमध्ये स्वतंत्र ताबे झाले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आमच्यात वाटपाचा दस्त झालेला नसल्याकारणे तो दस्त वादीने मला देण्याचे कुठलेही कारण नाही. मी प्रतिवादी क्र. २ सुरेश याची साक्ष घेणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादी याने गट क्र. १५४० ची विक्री करून त्याचे रक्कम रूपये ६,००,०००/- हडप केल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादीला वडिलांनी व्यवसायासाठी रूपये ६,००,०००/- ची मदत केल्याचे मी खोटे सांगत आहे.

२२. हे म्हणणे खरे नाही की, वडिलांच्या मृत्युनंतर सिमरतमल चुन्नीलाल या नावाने असलेला आडत व्यवसाय हा बंद पडला. साक्षीदार स्वत:हू सांगतो की, तो वादीने ताब्यात घेतला. हे म्हणणे खरे नाही की, वडिलांच्या मृत्युनंतर सदर आडत दुकान वादीने कधीही चालवले नाही. सदरच्या व्यवसायाच्या गुडवीलचा पुरावा मी दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादीचा मोबाईलचा व्यवसाय हा भाड्याच्या जागेत आहे. हे म्हणणे खरे नाही की, सि. स. नं. ३३३ मध्ये मी वडिलांच्या हयातीपासून वालीस पेंडचा व्यवसाय करतो. मी सि स नं. ४२८ मध्ये वालीस पेंडचा व्यवसाय करतो. हे म्हणणे खरे नाही की, सदर व्यवसाय मी वडिलांच्या हयातीपासून करतो. हे म्हणणे खरे नाही की, मी व प्रतिवादी क्र. २ याने वादग्रस्त मिळकतीतील ब-याच जागांना कुलुप लावून बंद केल्या आहेत.

२३. माझा भाऊ सुरेश याचे वांबोरी येथे होलसेल व किरकोळ मालाचे मोठे दुकान आहे. हे म्हणणे खरे नाही की, एकत्रित कुटुंबाच्या उत्पन्नातुन त्याने हे दुकान टाकले. हे म्हणणे खरे नाही की, दि. १५/१२/२०१७ रोजी वादीने आमच्याकडे सर्व मिळकतीचे वाटप करून मागितले. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी मी व प्रतिवादी

क्र. २ याने वादीला गट क्र. ४४३, ४४३/१, ४४३/२ व ४८४ या मिळकती व्यतिरिक्त कुठल्याही मिळकती देणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादीला वादग्रस्त मिळकतीत कुठलाही हिस्सा मिळू नये म्हणून मी खोटे शपथपत्र दाखल करून आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास काही नाही.

श्रवणोत्तर स्विकृत

MAYUR EKNATHRAO PAWAR
Digitally signed by MAYUR EKNATHRAO PAWAR
Date: 2026.01.31 16:57:45 +0530

(मयुर ए. पवार)

दिनांक:-३१/०१/२०२६.

दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
ता. राहुरी, जि. अहमदनगर.